म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय का. वा.
दा. क. ३८१९

IRBK-0103819
IRBK-0103819

नों. क्र. ३८१९

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावें, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

सदाशिव अनन्त शुक्ल

# झुणका-भाकर

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. ३८५९ नों. दि
वि. का. ५१ क्र.

IRBK-0103819

जयहिंद प्रकाशन

मूल्य सहा आणे

मुद्रक
**ज. दि. देसाई**
राष्ट्रवैभव छापखाना
गिरगांव मुंबई ४

●

प्रकाशक
**ग. का. रायकर**
जयहिंद प्रकाशन
झावबाची वाडी
मुंबई २

●

प्रथमावृत्ति
१९ ऑगष्ट १९५१

●

चित्रकार
**रघुवीर मुळगांवकर**
२ री भटवाडी मुंबई ४

# झुणका-भाकर

सुप्रसिद्ध नाटककार आणि कवि **स. अ. शुक्ल** ह्यांची ही खुसखुशीत नवी नाटिका रसिकांच्या हातीं देतांना फार आनंद होत आहे.

झुणकाभाकर ! झुणकाभाकर म्हणतांच जात्युच्छेदनाची चळवळ डोळ्यांपुढें उभी राहते.

हिंदुसमाजांत जन्मजात जातिभेदांचा जो बुजबुजाट झाला आहे तो आतां शक्य तितक्या लौकर नाहींसा केलाच पाहिजे ह्याबद्दल समाजसेवकांत दुमत नाहीं. हे जातिभेद नष्ट करण्यासाठीं अनेक थोर लोकांनीं अनेक मार्ग सुचविलेले आहेत. त्याच मार्गांपैकीं एक साधा व सोपा मार्ग म्हणजे श्री. अनंतराव गद्रे यांनीं प्रवर्तित केलेला झुणकाभाकरीच्या आंदोलनाचा होय. हें आंदोलन गेलीं १५।१६ वर्षें महाराष्ट्र गाजवीत आहे. युद्धपूर्वकाळीं अखिल महाराष्ट्रांत झुणकाभाकरी-आंदोलनानें सहभोजनांच्या द्वारें विलक्षण जागृति निर्माण केली, हें अनेकांना आठवत असेलच. नियंत्रणें आल्यानंतर त्याच सहभोजनांच्या आंदोलनाला झु. भा. सत्यनारायणाचें स्वरूप दिलें गेलें आहे. हेंहि आंदोलन गेल्या दोन तीन वर्षांत प्रभावी ठरलेलें आहे.

अस्पृश्यतानिवारण हें जात्युच्छेदनाचें प्रकट स्वरूप होय. जात्युच्छेदन झालें कीं, आपोआपच अस्पृश्यतानिवारण होईल व अस्पृश्यतानिवारण झालें कीं, जन्मजात जातिभेदांचा बालेकिल्ला हादरून कोसळेल !

आतां स्वातंत्र्योत्तर काळीं अस्पृश्यतानिवारणाचा प्रत्यक्ष कायदाच झाला असून ह्या भारत देशांत आज कोणीहि कोणाला उच्च वा नीच म्हणूं शकत नाहीं. पण हा झाला कायदा ! हा कायदा कार्यक्षम व्हावयाचा म्हणजे त्याला सर्व समाजानें वृत्तीनें व कृतीनें पाठिंबा दिला पाहिजे. लोकांच्या मनांत दृढमूल झालेल्या उच्चनीचत्वाच्या भावनांत मूलभूत फरक झाल्याशिवाय हें साधणार नाहीं आणि म्हणून झुणकाभाकरीच्या आंदोलनाला विशेष अर्थ आला असून त्याला विशेष महत्त्वहि प्राप्त झालें आहे.

जातिभेद मोडण्याची व अस्पृश्यता-निवारणाची प्रत्यक्ष कृति म्हणजेच झुणकाभाकर चळवळ होय. ब्राह्मणांपासून भंग्यापर्यंत सर्वांनीं एके ठिकाणीं जमावयाचें, हरिजनदांपत्यानें सत्यनारायणाची पूजा करावयाची, त्या दांपत्यानें सत्यदेवाला दाखविलेला झुणकाभाकरीचा साधासुधा पवित्र नैवेद्य प्रसाद म्हणून सर्वांना वांटावयाचा आणि जमलेल्या स्पृश्यास्पृश्यांनीं एकमेकांविषयीं सद्भावनायुक्त आदरभाव प्रकट करावयाचा असें ह्या आंदोलनाचें आजचें स्वरूप आहे. ह्यामुळें एकाच वेळीं धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक व पारंपरिक भेदभावांचें निर्मूलन होत असतें.

एकदां समाजांतील भेदभाव नष्ट झाले, त्यांत एकता उत्पन्न झाली, त्याची समानवृत्ति बळावली आणि सद्भावना निर्माण झाल्या म्हणजे तो अनेक दृष्टीनीं बलशाली होईल हें निराळें सांगावयास नकोच! अर्थात् ही चळवळ आपल्या देशाचें हित साधील आणि म्हणून ही प्रारंभीं जात्युच्छेदक पण अंतीं देशोद्धारक ठरल्याशिवाय राहणार नाहीं. म्हणूनच थोर थोर लोकांचा ह्या प्रथेला मनः पूर्वक पाठींबा मिळालेला आहे.

स्पृश्यास्पृश्यांनीं पवित्र भावनेनें एका ठिकाणीं जमून खेळीमेळीच्या वातावरणांत झुणकाभाकर खाल्ली कीं, पोटांतील हीन भावना सहजच नष्ट होतात. म्हणून सत्यदेवाजवळ ह्या झुणकाभाकरीच्या नाट्यसंवादांत मागण्यांत आलेली पोटभर झुणकाभाकरीची मागणी ‘लई न्हाई’ असेंच कोणीहि म्हणेल.

उत्सव-संमेलन-प्रसंगीं प्रयोग करण्यास उपयुक्त अशी ही रंजक व बोधप्रद नाटिका नाट्यप्रेमी रसिकांस प्रिय होईल अशी आशा आहे.

ग. का. रायकर

धर्मवीर

अनंतराव गद्रे

यांस

सस्नेह सादर

## पात्रें :

[प्रवेशाच्या अनुक्रमानें]

अनंतराव

बाळासाहेब

शेवंती

हऱ्या

पिऱ्या

जंबूआण्णा

धर्मा

देवबा

शिदनाक

सावकार

शिवाय, शाळेंत जाणारीं मुलें वगैरे

*

प्रस्तुत नाटिका ऑल इंडिआ रेडिओ, मुंबईकेंद्रावरून दिनांक २८-२-१९५१ रोजीं ध्वनिक्षेपित केली गेली होती. त्याबद्दल मुंबई—रेडिओ—केंद्राचा मी अत्यंत आभारी आहे.

—लेखक

अनुक्रम ९८४२८
वि. ना. ०१-०१४
०८४९
नों. दि. २०/१९५

# झुणका–भाकर

[ गांवाबाहेरील सावकारांच्या मळ्यांत अनंतराव, मोस्तर, शाळेतील मुलां–मुलींना सहलीसाठीं घेऊन आले आहेत. मोटेचा आवाज, गुरांचें हंबरणें, पांखरांचा किलबिलाट वगैरे संमिश्र आवाजांतच मुलांच्या पुढील गाण्याचे सूर मिसळलेले ऐकूं येतात. ]

मुलें :

आपण सारे बहीण–भाऊ
या रे सारेजण मिळुनी
ऐक्याचें गाणें गाऊं !

उच्च नीच हा भेद न पाळूं
द्वेष-दंभ–मत्सरही जाळूं
आपसांतले कलह विसरुनी
सन्मार्गानें जाऊं !
आपण सारे बहीण–भाऊ !

देश आपुला भारत छान
जगांत सुंदर श्रेष्ठ महान्
भावें भजुं या देश–देव हा
प्राण–फुलांना वाहूं !
एक दिलानें राहूं !
आपण सारे बहीण–भाऊ !

[ गाणें संपतांच सर्व मुलें 'जयहिंद'—'वंदे मातरम्' असा जयघोष करतात.

**बाळासाहेब :** मास्तर ! हा आला आमचा मळा !

**अनंतराव :** अरे, खरंच की ! किति लवकर आला !

**१ मुलगा :** बाळासाहेब, कित्ती सुंदर आहे तुमचा मळा !

**२ मुलगा :** कसा बहरलाय् छानदार !

**३ मुलगा :** चहुंकडं कसं हिरवंगार !

**अनंतराव :** बरं पण मुलांनों ! आधीं आतां आपण पोटभर फराळ करूं–विश्रांती घेऊं, आणि मग उन्हं कलल्यावर—

**बाळासाहेब :** समोरच्या डोंगरावर बहिरोबाच्या दर्शनाला जाऊं !

[ 'हो–हो–बहिरोबाला जाऊंया' असें सारेजण ओरडतात.

**अनंतराव :** पथारी अंथरा. आपापल्या शिदोऱ्या सोडा. सर्वांनीं एका पंगतीला बसायचं.

**हऱ्या :** व्हय तर ! समद्यांची एक पंगत ! एक संगत !

**पिऱ्या :** तरच ट्रीपला खरी रंगत !

**अनंतराव :** पिऱ्या, हऱ्या, पानं वाढून घ्या. प्रत्येकानं आपापल्या शिदोरींतलं सर्वांना थोडं थोडं द्यायचं. एकेकट्यानं खायचं नाहीं.

**बाळासाहेब :** गोपाळकाला करायचा !

**१ मुलगा :** बाळासाहेबाची शिदोरी भरगच्च दिसतेय् !

**बाळासाहेब :** खूप खूप फराळाचं दिलंय् आईनं. बटाट्याची भाजी, शिरा, पुऱ्या—

**शेवंती :** लोणचं, दहीं, दूध—

**बाळासाहेब :** लोणी, कांद्याचं थालीपीठ—

अनंतराव : अरे वा! चंगळ आहे की! तुमची एक शिदोरी सर्वांना पुरून उरेल. गोविंदा, तूं रे काय काय आणलं आहेस?

गोविंदा : मी होय मास्तर? लाडू, शेव, चिवडा आणलाय्!

अनंतराव : हॉटेलवाल्याचाच बेटा तूं! बरं पण पिऱ्या, हऱ्या, तुम्ही रे काय, काय आणलंय्?

पिऱ्या : आमी काय आननार? कांदा-भाकर, आन् लसनीचं तिखट—

हऱ्या : म्यां आनलीया झुनका-भाकर!

['झुणका-भाकर' असे ओरडून सर्व मुलें हांसतात.

अनंतराव : अरे, असं हांसायला काय झालं? झुणका-भाकर, कांदा-भाकर हेंच तर आपल्या रांगड्या देशाचं, महाराष्ट्राचं मुख्य अन्न आहे.

खाऊं आपण झुणका-भाकर
देऊं समाधानाचा ढेकर!

[सर्व मुलें वरीलप्रमाणें म्हणतात.

अनंतराव : झुणका-भाकर खाणाऱ्या मर्द मावळ्यांच्या मदतीनंच छत्रपती श्रीशिवाजी महाराजांनीं स्वराज्याची स्थापना केली! खरं कीं नाहीं?

मुलें : खरं आहे मास्तर! शिवाजी महाराज कीं जय!

अनंतराव : शिवाय, अन्न म्हणजे परब्रह्म आहे. कोणत्याहि अन्नाला नांवं ठेवूं नयेत. पिऱ्या, हऱ्या, तुमची झुणका-भाकर सर्वांच्या पानांवर थोडी थोडी वाढा.

पिऱ्या : बाळासाहेब, तुमची शिरापुरी ठेवा बाजूला. ह्या माझ्या खमंग झुनका-भाकरीची चव तरी बघा...

हऱ्या : शेवतीबाई, झुनक्याची लज्जत तर लईच न्यारी! बासुंदी परीस चखोट!

शेवंती : हऱ्या, मला आणखी वाढ झुणका.

हऱ्या : घ्या की, मस्त हाय. दौलती, तुझी अंबाड्याची भाजी बी वाढ की समद्यासनी.

हऱ्या : मास्तर, तुमासनी झुनका-भाकर?

अनंतराव : अरे विचारतोस काय? वाढ ना. मला तर श्रीखंड-पुरीपेक्षां जोंधळ्याची भाकरी आणि झुणकाच जास्त आवडतो.

पिऱ्या : आन् मास्तर, बाजरीची भाकरी नी लसनाची चटणीबी झक्क लागतीया!

अनंतराव : अरे हो, पण मुख्यच राहिलं! पाणी! आधीं पाणी आणलं पाहिजे. ती कळशी घ्या इकडे-

बाळासाहेब : मास्तर, तुम्ही कशाला पाणी आणतां? मी आणतो ना.

अनंतराव : छे. छे. तूं नकोस आणूं.

पिऱ्या : आमी आनतो मास्तर.

हऱ्या : पर आमच्या हातचं पानी चालंल ना तुमास्नी?

अनंतराव : न चालायला काय झालं? पण नीट सांभाळून हां! विहीर खोल आहे.

पिऱ्या : पर चांगल्या पायऱ्या हैत की खालपातुर.

[ पिऱ्या व हऱ्या कळशी घेऊन पाणी आणतात. इतक्यांत जंबूआण्णा येतो.

**जंबूआण्णा** : अरे, अरे, हें काय ? हें काय ? अहो अनंतराव ! अहो, अनंतराव मास्तर ! अहो, धांवा–धांवा–आधीं इकडे या....

**अनंतराव** : कोण ? जंबूआण्णा ?

**बाळासाहेब** : आमचे दिवाणजी ! पण हे कशाला इकडे अडमडले ?

**अनंतराव** : काय हो, काय झालं जंबूआण्णा ? पोरं पडलीं कीं काय विहीरींत ?

**जंबूआण्णा** : अहो, तीं बुडून मेली असती तर फार बरं झालं असतं. पण हा भ्रष्टाकार बघा !

**अनंतराव** : अहो, कसला भ्रष्टाकार ? काय, बरळतांय् काय ?

**जंबूआण्णा** : अहो, पिऱ्या, हऱ्या विहिरीचं पाणी आणताहेत !

**अनंतराव** : मग बिघडलं कुठं ? मीच सांगितलं त्यांना....

**जंबूआण्णा** : तुम्ही–तुम्ही सांगितलं ? राम राम राम ! म्हारड्यांच्या पोरट्यांनीं विहीर बाटवली !

**अनंतराव** : आटवली नाहीं ना विहीर ? तुमच्या अंगाची आग कां झाली तें आत्तां कळलं. मला वाटलं, विहिरीला आग लागली म्हणून तुम्ही आक्रोश मांडलात ! भले जंबूआण्णा ! (हंसतो)

**जंबूआण्णा** : अनंतराव, अनंतराव ! असं हंशावारी नेऊं नका. तुम्ही महारड्यांच्या हातचं पाणी पितां ? आणि ह्या साऱ्या मुलांनाही पाजवतां ? महाराच्या हातचं पाणी....



[library stamp with handwritten number]

**बाळासाहेब :** दिवाणजी ! महार-महार काय म्हणतां ?

**शेवंती :** हरिजन म्हणा ! हरिजन !

**जंबूआण्णा :** हरिजन म्हटल्यानं पाणी विटाळणार नाहीं वाटतं ? मला अक्कल शिकवतां ?

**अनंतराव :** जबुंअण्णा, तुमचं मनच विटाळलेलं आहे क्षुद्र, हीन कल्पनांनीं ! हरिजनसुद्धां माणसंच आहेत तुमच्या आमच्या सारखीं !

**जंबूआण्णा :** हो पण तीं अस्पृश्य आहेत. अडाणी, घाणेरडी आहेत.

**अनंतराव :** ती अडाणी, घाणेरडी असतील तर हा दोष त्यांचा नव्हे. आपलाच आहे. आपण स्वतःला उच्च, सुशिक्षित समजतों ना ? मग आपण त्यांना शिकवून शहाणं केलें पाहिजेत. त्यांना स्वच्छतेचे धडे दिले पाहिजेत. नुसतं अस्पृश्य-अस्पृश्य म्हणून त्यांना दूर लोटणं, त्यांच्या सावलीचाही विटाळ मानणं माणुसकीचं लक्षण नव्हे. तुमचा डावा हात रोज भंग्याचं काम करतो. पण लगेच स्वच्छ केल्यावर तो स्पृश्य होतोच ना ? त्यांचीं अंतःकरणं तर तुमच्या आमच्यासारखी अमंगळ खास नाहींत.

**जंबूआण्णा :** हा आचरट युक्तिवाद बस्स करा. धर्म-धर्म म्हणून कांहीं आहे कीं नाहीं ?

**अनंतराव :** माणसा-माणसांत भेद करतो, केवळ जन्मावरून दुसऱ्याला हीन लेखतो, तो मुळीं धर्मच नव्हे.

जबूआण्णा : कमाल केलीत अंतूमास्तर ! शाळेंत हेंच शिकवतां वाटतं पोरांना ?

अनंतराव : अलबत् ! हेंच शिकवतों मी सर्वांना. लहान मुलांच्या कोवळ्या बुद्धीवर खऱ्या धर्माचे संस्कार करणं, माझं कर्तव्यकर्मच आहे.

जंबूआण्णा : कर्तव्य राहील बाजूला. आणि तुमचं कर्म मात्र उभं राहील तुमच्यासमोर ! बाळासाहेब, शेवंतीबाई, चला उठा पानावरनं. ह्या म्हारड्यांच्या पंगतीला जेवतां ? लाज नाहीं वाटत ?

बाळासाहेब : माणसाच्या पंगतीला माणसांनीं बसायचं, ह्यांत लाज वाटण्यासारखं काय आहे ?

शेवंती : तुम्हालाच कांहीं लाज वाटत असेल तर चालते व्हा तुम्ही येथून !

जंबूआण्णा : हा उद्धटपणा ! ह्या जंबूआण्णाचा असा अपमान ? उभ्या बारा गांवांना ज्याचा दरारा त्या सावकारांच्या दिवाणजीचा असा अपमान ? मालकांचीं मुलं म्हणून गय करणार नाहीं. असाच जातों नि मालकांनांच इकडे घेऊन येतों. मग पाहा तमाशा !

बाळासाहेब : पुष्कळ दाखवलांत तमाशा ! चालते व्हा आधीं—

[ जंबूआण्णा तणतणत जातो. मुलें 'हुप्प हुप्प हुर्ये' असें ओरडतात.

अनंतराव : बोला ! पार्वतीपते हरहर महादेव ! सीताकांत-स्मरण जय जय राम ! (मुलें घोप करतात.) बाळानों ! आतां सावकाश चालू दे फराळ !

[मुलें फराळ करूं लागतात. इतक्यांत देवबा, धर्मा, शिदनाक आपल्या पोरांसह येतात.

**देवबा :** जोहार मायबाप !

**अनंतराव :** कोण ? देवबा, धर्मा, शिदनाक ! भर उन्हाचं पोराबाळांना घेऊन कुठं निघालांत ? पाण्याच्या मोहिमेवर वाटतं ?

**धर्मा :** व्हय मायबाप !

**शिदनाक :** करायचं कसं मायबाप ? चार मैल लांब तळ्यावर यावं लागतंया पान्यासाठीं. ओढा आटलाया....हाय कुंट पानी जवळपास महारवाड्याला ?

**अनंतराव :** अरे, मग ह्या सावकारांच्या विहिरीचं पाणी कां नेत नाहीं तुम्ही ?

**बाळासाहेब :** हो. हो. पाण्यानं तुडुंबलेली असते आमची विहीर.

**शेवंती :** तळ्यापेक्षां जवळही आहे....

**धर्मा :** समदं खरं. पन उपेग काय ?

**शेवंती :** हिरीच्या बाजूनंबी फिरकूं देत न्हाई सावकार !

**पिऱ्या :** गेल्या सालीं दुकाळांत गुरं–मानसं पान्याविगर तडफडून मेलीं...

**धर्मा :** पर सावकारानं आपल्या हिरीचं पानी न्हाई घेऊं दिलं कुनाला.

**अनंतराव :** मागलं जाऊंदे. आतां हे छोटे मालकच सांगताहेत...

**बाळासाहेब :** हो. हो. मी सांगतों–नेत चला पाणी आमच्या विहिरीचं.

अनंतराव : आतां कां थांबलांत ? तुम्ही पाणी भरा. तंवर तुमच्या ह्या कच्च्या बच्च्यांना खाऊं देतों...बाळासाहेब, थोडी थोडी शिरा—पुरी द्या ह्या मुलांना...

बाळासाहेब : हो. हो. या रे पोरांनों ! हें सगळंच घ्या !

धर्मा : शेवंतीबाई, ह्या माझ्या धाकल्याला जरा पानी वाढा हो !

शेवंती : हा तांब्याच घे...पाजव त्याला—

[ शेवंती धर्माच्या हातीं तांब्या देते. इतक्यांत सावकार व जंबूआण्णा येतात.

सावकार : अग थांब—थांब कार्टे, काय मांडलंस हें ?

शेवंती : कोण ? बाबा आणि जंबूआण्णा !

जंबूआण्णा : बघा मालक, बघा ! दिवसाढवळा कसा भ्रष्टाकार, अनाचार चालला आहे तो !

सावकार : कार्टे, महाराच्या हातीं तांब्या देतेस ? त्याला शिवतेस ?

शेवंती : मग ? पाणी हवं होतं त्याच्या मुलाला प्यायला.

सावकार : पाणपोई घातलीस वाटतं सटवे ? अन् काय रे धर्म्या, तुला तरी कांहीं लाज ? ठेव तो तांब्या खालीं.

शेवंती : हें घे रे पाणी....मी वाढतें...

सावकार : दूर—दूर—! विटाळ होईल. दूर हो आधीं.

शेवंती : बाबा, सोवळं—ओवळं घरांत ! बाहेर कसला विटाळ—चांडाळ ?

जंबूआण्णा : ऐका, ऐका मालक ! लहान तोंडीं मोठा घांस....

सावकार : तोंड फोडून टाकीन. ठाऊक नाहीं —

**बाळासाहेब :** धर्म्या, विहिरींतनं घडा भरून आण—

**सावकार :** खबरदार विहिरीला शिवलास तर! इथं पाणी भरायला आलांत होय? तुमच्या बापाची आहे का ही विहीर?

**बाळासाहेब :** माझ्या बापाची आहे. मीच ह्यांना सांगितलं—

**सावकार :** अरे गाढवाच्या लेका!

**अनंतराव :** सावकार, कां उगींच स्वतांला गाढव म्हणून घेतांय्? बाळासाहेब लहान असून केवढ्या थोर मनाचे आणि तुम्ही—

**सावकार :** समजलं. म्हणजे ही सारी चिथावणी तुमची आहे तर!

**जंबूआण्णा :** मग? सांगतों काय मालक? ह्या अनंतरावानंच मुलांना वहकावलं आहे. ह्या महारड्यांना चिथावलं आहे. हें...हें पहा ना....सहभोजन मांडलं आहे ह्यांनीं...अस्पृश्यांचा उद्धार—

**अनंतराव :** अस्पृश्यांचा नव्हे–आमचाच उद्धार चालवला आहे आम्ही! अस्पृश्यता हा हिंदु धर्मावरचा कलंक आहे. आमच्या कोट्यवधि बांधवांना आम्ही इतके दिवस दूर ठेवलं—

**जंबूआण्णा :** म्हणून तुम्ही आतां त्यांना जवळ घेऊन मिठ्या मारतांय् होय?

**अनंतराव :** अस्पृश्यता पाळणं हा कायद्यानंच गुन्हा ठरवला आहे. सार्वजनिक ठिकाणीं कुठंच कुणालाही अस्पृश्य म्हणून तुम्हाला मज्जाव करतां येणार नाहीं.

**जंबूआण्णा :** कायदा शहरांत! इथं आमच्या गांवांत नाहीं. इथं आमच्या सावकारांचाच कायदा चालणार बरं का हो कायदेपंडित!

**सावकार :** लांब तोंडानं मला कायदा शिकवतोय्! ठाऊक आहे मला कायदा! पण होणार आहे काय अशा नुसत्या कायद्यानं?

**अनंतराव :** खरं आहे. नुसत्या कायद्यानं काय होणार? तुम्हां सारख्या अट्टल सनातन्यांच्या विचार–सरणीतच बदल घडवून आणला पाहिजे. समाजांत जागृति केली पाहिजे.

**जंबूआण्णा :** त्यासाठींच तुमचा अवतार झालेला आहे ना!

**अनंतराव :** हो. हो. त्यासाठींच हा सारा अट्टाहास आहे आमचा. देवबा, धर्मा, शिदनाक! पाहतां काय? खुशाल न्या विहिरीचं पाणी!

**सावकार :** खबरदार एक पाऊल पुढं टाकाल तर! ही माझी खासगी मालकीची विहीर आहे.

**अनंतराव :** पण गोरगरीबांना सक्तीनं वेठीला धरूनच ही तुम्ही फुकटांत खणून, बांधून काढलीत!

**सावकार :** पुरे–पुरे तुमचं शहाणपण! आधीं हें सांगा, माझ्या मळ्यांत हा पोरवडा, म्हारवडा कशाला गोळा करून आणलांत तुम्ही?

**बाळासाहेब :** बाबा, आम्हींच आग्रह केला—

**शेवंती :** म्हणून आमची ट्रीप ह्या खेपेला मास्तर इकडं घेऊन आले!

**सावकार :** पण माझ्या मळ्यांत हा भ्रष्टाकार मी चालूं देणार नाहीं. चालते व्हा येथून—

**अनंतराव** : तुमचा मळा ? अहो सावकार ! ह्या धर्म्याच्या बापाचा हा मळा खोट्या दस्तऐवजाच्या बळावर तुम्ही घशांत घातलांत, हें साऱ्या गांवाला ठाऊक आहे कीं !

**सावकार** : अंतू मास्तर ! तोंड सांभाळा ! मी पिढीजात सावकार आहे. तुमच्यासारखा कंगाल पोरेहांक्या, मास्तरडा नाहीं.

**अनंतराव** : गोरगरीबांच्या अज्ञानाच्या भांडवलावर तुमची सावकारी पिढ्यान् पिढ्या चालत आली खरी. पण आतां जमाना पालटला आहे....

**सावकार** : तुमची शाळाच बंद पाडतो. मग बसा कोकलत. कोण आपलीं पोरं तुमच्या शाळेंत धाडतो, तेंच मी पाहतों.

**जंबूआण्णा** : शेतकऱ्यांच्या मुलांना....ह्या महारड्यांना म्हणे शिकवून शहाणं करणार ! अन् मग आम्ही काय करणार ?

**अनंतराव** : उकीरडे फुंकणार ! दुसरं काय ? शेतकरी अडाणी आहेत म्हणून तर त्यांना लुबाडायला फावतंय् सावकारांना आणि तुमच्यासारख्या ग्रामकंटकांना !

**सावकार** : अवांतर बडबड नको. आधीं चालते होतां येथून कीं घालूं टाळकींत सोटा ?

**जंबूआण्णा** : हां. हां. मालक ! उगीच संताप करून घेऊं नका जिवाला. तुमचं तें जुनं दुखणं उलटेल. काळजांत कळ येईल.....

**अनंतराव** : शेतकरी शिकून शहाणे व्हायला लागल्यावर सावकारांच्या काळजांत कळ उठणारच !

**सावकार :** धर्मा, देवबा, बऱ्या बोलानं चालते व्हा—नाहीतर ह्या मडक्यांबरोबरच तुमच्या डोक्यांची मडकींही फोडून टाकीन !

**अनंतराव :** अस्सं ! तर मग होऊनच जाऊं दे...चला, या रे माझ्यामागून विहिरीवर—

**देवबा :** जाऊं दे मास्तर ! आमी आपलं तळ्याचंच पाणी नेतों—

**सावकार :** तळ्याचंही पाणी न्यायचं नाहीं.

**धर्मा :** म्हंजी ? हा जुल्म झाला !

**सावकार :** तुमची मस्ती जिरवायला हाच उपाय !

**शिद्नाक :** मंग कुठलं पानी न्यायचं आमी ?

**सावकार :** ह्या तुमच्या म्होरक्याला, अंतूमास्तराला विचारा.

**जंबूआण्णा :** हा खणेल विहीर तुमच्यासाठीं ! अस्पृश्यांचा कैवारी, महात्मा हा !

**अनंतराव :** सावकार ! सार्वजनिक तळ्याच्या पाण्याला बंदी कराल तर फुकट कायद्याच्या कचाट्यांत अडकाल ! बजावून ठेवतो—

**सावकार :** अरे जा ! कोर्ट—कायदे लढवण्यांतच जन्म गेलाय् माझा. मला कायद्याचं भय घालतोस ?

**जंबूआण्णा :** कायदा पाणी भरतोय् सावकारांच्या घरीं ! ठाऊक नाहीं ?

**सावकार :** तुम्हांलाच कायद्याच्या कैचींत पकडून तुरुंगाची हवा दाखवीन.

**१ मुलगा :** नका—नका—माझ्या बाबांना तुरुंगांत घालूं नका—पाय धरतो तुमचे—

सावकार : अरे–अरे–दूर हो–शिवलास ना कार्ट्या !–चल. दूर हो आधीं—

[ मुलाच्या डोक्यांत सावकार सोटा हाणतो. खोक फुटते–मुलगा किंचाळतो.

धर्मा : सावकार सावकार ! लई बंगाळ केलंत ! पोराच्या डोक्यांत सोटा हाणलांत ?

बाळासाहेब : केवढी खोक फुटली बघा—

शेवंती : उगी–उगी हं बाळ ! बाबा–बाबा, काय केलंत हें ?

सावकार : कारटं धडधडीत शिवलं ना ?

अनंतराव : मग ह्या विहिरींत जलसमाधी घेऊन शुद्ध व्हा !

शेवंती : बाबा, आमच्या साऱ्या आनंदावर पाणी ओतलंत तुम्ही ! कशाला आलांत इकडे ?

सावकार : घरीं चल. तुला सांगतों...

जंबूआण्णा : म्हारड्यांच्या पंगतीला जेवलांत ? आधीं गोमूत्रानं आंघोळ करा–चला घरीं.

शेवंती : आम्ही नाहीं येणार घरीं.

सावकार : तुमचा बाप येईल. दिवाणजी, कुत्र्यासारखं फरफटत ओढून आणा त्या कारट्यांना–द्या थोबाडींत—

बाळासाहेब : आम्ही नाहीं येणार ! सोडा–सोडा आम्हाला—

[ मुलांना जंबूआण्णा ओढीत नेतो. ती ओरडतात.

★

# २

[ सावकार व जंबूआण्णा रस्त्यानें चालले आहेत. सावकाराच्या छातींत कळा निघतात.

सावकार : ( कण्हत ) जंबूआण्णा ! जंबूआण्णा ! दिवाणजी !

जंबूआण्णा : मालक ! मालक ! सावकार ! अहो, असं काय करतांय् ! घेरी आली वाटतं ?

सावकार : मेलों—मेलों !—छातींत कळा येताहेत हो ! अग आई ग !

जंबूआण्णा : छातींत कळा ? अरे देवा ! अरेच्या, हे तर घोड्यावरच बेशुद्ध पडले ! आतां कसं करावं ? आसपास चीट पांखरूंही कुणी कुठं दिसत नाहीं ! तिकडे शेतांत दिसतंय् कुणीसं. अरे होऽऽऽ ! इकडे या—इकडे या !

[ जंबूआण्णा घाबरून आरोळ्या मारतो. धर्मा, देवबा, शिदनाक धांवून येतात.

**धर्मा :** तुमी हारळ्या मारल्यांत जंबूआण्णा ?

**जंबूआण्णा :** होय रे धर्म्या !

**देवबा :** आन् सावकारास्नी काय झालंया ?

**शिदनाक :** चक्कार आलीया जनुं.

**जंबूआण्णा :** अरे होय रे ! मीच चांगला चक्कांत सांपडलोंय रे ! शिदनाक ! आतां कसं करावं रे ?

**धर्मा :** तकडं झाडाखालीं सांवलीला तरी घेऊन चला यास्नी. काय देवबा ?

**देवबा :** झाडाखालीं नग. पल्याडल्या त्या मंगळाईच्या देवळांतच नेऊं या....असंच घोड्यावरनं—

**जंबूआण्णा :** चला तर...अरे, झ्यक्–झ्या--झ्या....बेटं घोडं आहे कीं सोंग आहे ! चालतच नाहीं.

**धर्मा :** पर अशी एकदम चक्कार कशी आली सावकारास्नी ?

**जंबूआण्णा :** मालकांचं हें जुनं दुखणं आहे धर्म्या ! काळजाचा विकार आहे हा.

**देवबा :** काळजाचा इकार ? पर काळीज हाय का सावकाराला ?

**शिदनाक :** अरं चूप देवबा ! परसंग काय नी तुझं बोलनं काय !

**धर्मा :** पर आजारीपनांत कुटं निघालं व्हतं सावकार घोड्यावर सवार होऊन ?

जंबूआण्णा : अरे, आठ दिवस झाले घर सोडून ! घरांतून निघतांना नांव नव्हतं आजाराचं.

शिदनाक : म्हंजी ? वसुलीच्या दौऱ्यावर हैत जनु सावकार.

देवबा : पर ह्यो आजार कसा कुठनं मधींच उपाटला ?

जंबूआण्णा : अरे, असाच असतो हा काळजाचा विकार ! चालतां बोलतां एकदम उपटतो. आठ दिवसांत ठणठणीत तब्बेत होती मालकांची....पण आतांच एकदम कोलमडली...पीरवाडीस्नं काल बीरवाडीला गेलों– तेथून सकाळीं उठून घरीं निघालों. परवां एकादशी झाली. काल सोमवार झाला. लागोपाठ दोन दिवस कडकडीत निर्जळीं उपोषण. मुक्कामावर पोंचल्यावर आज पारणं फेडायचं !

शिदनाक : म्हंजी ? दोन दिसांत ह्यांच्या पोटांत अन्न न्हाई ?

जंबूआण्णा : न्हाई ! अन् त्यांत ही घोड्यावरल्या प्रवासाची दगदग—

धर्मा : त्यांतून भर बाराची येळ ! उन्हाच्या तिरपीनं आमचाबी जीव हैराण होतोया....हें तर पिकलं पान—

जंबूआण्णा : उलटलं जुनं दुखणं ! बरं झालं तुम्ही धांवून आलांत हांकेला—

देवबा : शेतांत काम करीत व्हतो–इकत्यांत हारळया आल्या तुमच्या—

जंबूआण्णा : अरे, मालकांना घेरी येतांच माझेच हात पाय गळाले. तोंडचं पाणी पळालं माझ्या....

देवबा : हें आलं मंगळाईचं देऊळ! उतरा खालीं सावकारास्नी.

जंबूआण्णा : अरे, पण मी एकटा काय करूं? तुम्ही हात लावा की...देवबा, शिदनाक या असे—

देवबा : अवो, पण आमी कसं शिवायचं सावकारास्नी?

जंबूआण्णा : अरे, खुळ्यांनों, ही का विटाळ–चांडाळ पाळायची वेळ? सावकारांचा चाललाय प्राण! चला, ठेवा खालीं उचलून....धर्मा, तुझं घोंगडं आंथर...अगदीं अलगद हळूं–हळूं उचला हं! अजून बेशुद्धच आहेत—

धर्मा : कांदा ठेचूनशान नाकाशीं धराया होवा.

जंबूआण्णा : पण आतां इथं कुठं आडरानांत कांदा मिळणार?

देवबा : आमच्या न्याहरीच्या शिदोरींत हाय की कांदा—

जंबूआण्णा : अरे, मग उभा काय राहिलास? आण लौकर. हरे राम! असा प्रसंग वैऱ्यावरसुद्धां येऊं नये.

देवबा : ह्यो घ्या कांदा—

[ कांदा ठेचून नाकाशीं धरतात. सावकार शुद्धीवर येतो.

सावकार : ( कण्हत ) पाणी–पाणी–पाणी!

जंबूआण्णा : अरे, पाणी–पाणी आणा—

शिदनाक : पानी राहिलं लांव तकडं बामणाच्या हिरीला—

धर्मा : हा घ्या माजा तांब्या–आणा जाऊन दिवाणजी—

जंबूआण्णा : अरे, पण मी कसा इथनं हाल्रूं? तुझ्या तांब्यांत आहे ना पाणी?

**धर्मा** : हाय. पर म्हाराचं पानी बामनाला कसं पाजवायचं ?

**देवबा** : अरं मर्दा ! इथं हाय सावकाराच्या जगन्या-मरन्याचा सवाल—

**जंबूआण्णा** : अन् ह्यावेळीं कसला घेऊन बसलास ब्राह्मण आणि महार ? आण तें पाणी इकडे—

**सावकार** : पाणी–पाणी–पाणी !

**जंबूआण्णा** : हें घ्या मालक, पाणी ! (जंबूआण्णा सावकाराला पाणी पाजवितो.)

**देवबा** : म्हाराचं पानी बामनाला ! द्येवबी खूप येळ आणतोया मानसावर !

**सावकार** : आई ग ! मेलों–मेलों—

**जंबूआण्णा** : पुन्हा कळ आली वाटतं छातींत ?

**शिदनाक** : दिवाणजी ! मला ठावं हाय काळजाच्या इकारावरचा दवा ! आहे झाडपाल्याचंच, पर लई गुनकारी. खिनांत-आराम पडंल बगा—

**जंबूआण्णा** : अरे, मग लौकर घेऊन ये. झाडपाल्याचं असलं म्हणून काय झालं ? औषध आहे ना तें ? नाहींतरी आतां इथं डाकटर कुठला आणायचा ? तात्पुरता तर आराम पडेल. पुढचं पुढं !

**शिदनाक** : घेऊन येतो दवा....तंवर तुमी इटकरीनं छाती शेका सावकारांची.

धर्मा : व्हय–व्हय–शेकतो–शेकतो....तूं धांवत जाऊन पळत ये.

[ शिदनाक जातो. सावकार कण्हत बोलूं लागतो.

सावकार : आई ग ! देवा रे ! कुठं आहे मी ?

जंबूआण्णा : मालक, आपण मांगवाडीजवळ मंगळाईच्या देवळांत आहोंत.......

सावकार : तुम्ही कोण ?

जंबूआण्णा : म्हणजे ! मी–मी–जंबूआण्णा—आपला दिवाणजी, मालक ! आतां थोडं बरं वाटतंय् ना ?

सावकार : इथं कसा आलों मी ?

जंबूआण्णा : म्हणजे ? तुम्हांला कांहींच आठवत नाहीं का ?

देवबा : अवो ! त्यांस्नी कसं आठवणार ? बेसुद पडलं व्हतं ना ते ?

जंबूआण्णा : खरंच की ! मीच शुद्धीवर नाहीं म्हणायचा !

सावकार : हे कोण दुसरं ?

जंबूआण्णा : हे आपले धर्मा, देवबा ! मालक, आपण बीरवाडीसनं घरीं परत चाललों होतों. वाटेंत तुम्हाला मध्येंच काळजाचा झटका आला. घोड्यावरच बेशुद्ध होऊन पडलांत ! हे देवबा, धर्मा, शिदनाक माझ्या हांकेला धांवून आले. म्हणून वेळ निभावली. आम्ही तुम्हाला इकडे देवळांत घेऊन आलों—देवबा, धर्मा तुमची छाती शेकताहेत–शिदनाक गेलाय् औषध आणायला– ह्या विकारावर चांगलं औषध आहे त्याच्याजवळ—

**सावकार** : खरंच ?

[ शिदनाक येतो.

**शिदनाक** : दिवाणजी ! हा घ्या दवा ! ह्यो रस पाजवा सावकारांस्नी.

**सावकार** : शिदनाक !

**शिदनाक** : जी सावकार ! औषध आणलंय् ! रामबाण हाय ! चार थेंबांत चिमत्कार बगा—

**सावकार** : मग तें तूंच घाल तुझ्या हातानं माझ्या तोंडांत—

**शिदनाक** : म्या कसं घालावं जी ? दिवाणजी घालतील की !

**सावकार** : शिदनाक, देवबा, धर्मा ! लांब कां बसलांत रे ? अगदीं माझ्याजवळ मला खेटून बसा रे ! शिदनाक, पाजव मला औषध. ( शिदनाक औषध पाजवितो. ) तुम्ही आज मला मरणाच्या दाढेंतून वाचवलंत. जीवदान दिलंत !

**देवबा** : छे वो ! इक्तं काय केलं आमी ? मानूस–धरमच हाय ह्यो.

**सावकार** : तुम्ही सारी देवमाणसं आहांत. मी मात्र नांवाचा माणूस....तुमच्या सांवलीचाही विटाळ मानला मी आजवर—

**शिदनाक** : सावकार ! लई बोलून तरास व्हईल. गुमान डोळं मिटूनशान पडा—

**सावकार** : आजवर मिटलेलेच होते माझे डोळे. पण ते आज साफ उघडले आहेत. आई ग !

**शिदनाक** : पुन्हां आली वाटतं कळ छातींत ? गुमान पडा बघूं. एक सबूद बोलू नगा.

[ 'आपण सारे बहीण–भाऊ' हे मुलांचें गाणें लांबून ऐकूं येते.

**जंबूआण्णा** : अरेच्या ! हें मुलांचं टोळकं कुठं चाललंय् ?

**देवबा** : अंतूमास्तराची टिरीप चाललीया जनुं पोरास्नी घेऊन रामेश्वराच्या डोंगराला !

**जंबूआण्णा** : अरे, मग त्यांत आमचे बाळासाहेब आणि शेवंतीताईही असतील.

**सावकार** : इकडे बोलवा पोरांना. जंबूआण्णा, जा सर्वांनाच घेऊन या इकडे.

**जंबूआण्णा** : मी नको. हा शिदनाक जाऊं दे. माझ्या बोलावण्यानं येणार नाहींत ती मंडळी.

**सावकार** : शिदनाक, तूं जा बाबा. अनंतराव मास्तरांना....साऱ्या मुलांना घेऊन ये––

[ शिदनाक जातो.

**सावकार** : धर्मा, देवबा, आज मला पटलं. मानव–धर्म हाच खरा धर्म. अवांतर धर्माच्या बाता झूट आहेत. माणसानं आयुष्यांत पैशाला पैसा जोडीत राहण्यापेक्षां माणसं जोडावींत ! सध्यां पैशाचंच युग चाललंय् खरं. पण वेळेला पैसा नाहीं उपयोगी पडत. देवानं आपलीं सारीं लेकरं सारखीच जन्माला घातली पण आम्ही मुर्दाड

माणसांनीं आपसांत भेदभावाचं भूत निर्माण केलं...
माणुसकीला मुकून जातिभेदाचं खूळ पिकवलं !

[ मुलें, अनंतराव व शिदनाक येतात.

मुलें : जय हिंद ! वंदे मातरम् !

सावकार : या अनंतराव ! क्षमा करा. तुमचा उपदेश मी लाथाडला. पण आज परिस्थितीनंच मला चांगला धडा दिला.

अनंतराव : कळलं मला सारं. शिदनाकानं सांगितलं.

बाळासाहेब : बाबा–बाबा !

शेवंती : आतां बरं वाटतंय् ना तुम्हाला ?

सावकार : हो बरं बाळानो ! ह्या मंडळींनीं मला पुनर्जन्म दिला. मला माणसांत आणलं.

शिदनाक : दोन दिसांत अन्न नाहीं तुमच्या पोटांत. थोडं दूध घ्या. म्हंजे हुषारी वाटेल. धर्म्या, जा र, दूध घेऊन ये—

बाळासाहेब : बाबा, फराळाचा डबा आहे ना आमचा भरलेला ! आईनं शिरा–पुरी दिली आहे.

सावकार : तुझी शिरा–पुरी नको. हऱ्या, तुझ्या शिदोरींत काय आहे रे ?

हऱ्या : झुणका–भाकर हाय सावकार ! पर लई खमंग, झणझणीत हाय झुणका !

सावकार : आण इकडे तुझी झुणका–भाकर ! तीच मला खावीशी वाटते आज.

[library stamp: ग्रंथालय, 964756, 21-11-87, नों. दि. 24/7/94]

**देवबा :** सावकार—सावकार ! म्हाराच्या घरची झुणका—भाकर खाणार तुम्ही ?

**सावकार :** काय हरकत आहे ?

**अनंतराव :** एकनाथमहाराजसुद्धां महाराच्या घरीं जेवले होते !

**सावकार :** आम्ही फक्त साधुसंतांचे गुण गातो. त्यांचीं भजनं गातो. पण त्यांनीं उपदेशिलेलीं माणुसकीचीं, समतेचीं तत्त्वं मात्र आचरणांत आणीत नाहीं.

**अनंतराव :** प्रत्यक्ष पंढरीनाथ पांडुरंग आपल्या भक्तासाठीं महार बनला होता !

**सावकार :** मग आम्हां पामरांची काय कथा ! इच्या, आण तुझी झुणका—भाकर !

**जंबूआण्णा :** छान—छान ! म्हणजे दोन दिवसांच्या उपोषणाचं पारणं आमचे मालक आतां महाराघरच्या झुणका—भाकरीवर सोडणार !

**अनंतराव :** जंबूआण्णा ! आतां तुम्हीही खा हा झुणका—भाकरीचा सा़द ! तुमच्या पंगतीला बसून सहभोजन करायला आम्ही तयार आहोंत ! मुलांनों ! आपली ट्रीप आतां इथंच ! सोडा आपापल्या शिदोऱ्या !

**देवबा :** धर्मा, शिदनाक ! आपणबी आपल्या शिदोऱ्या सोडूंया हतंच !

**जंबूआण्णा :** मालक ! आज तुमचा पुनर्जन्म झाला ! घरीं गेल्यावर एक फक्कडसा सत्यनारायण केला पाहिजे.

[redacted]ार : सत्यनारायण करायचाच ! अन् साऱ्या गांवाला झुणका–भाकरीचा प्रसाद वांटायचा ! शिदनाक, देवबा, धर्मा ! तुमच्या हातूनच प्रसाद वांटायचा बरं का !

धर्मा : अवो, झुणका–भाकर तरी समद्यास्नी पोटभर खायला मिळावी...

शेवंती : हेंच आमचं देवाजवळ मागणं आहे.

लई न्हाई, लई न्हाई मागणं
देवा, लई न्हाई, लई न्हाई मागणं !

समद्यांना खायास पोटभर
दे कष्टाची झुणका-भाकर
मानाचं अन् माणुसकीचं
जगुंदे आम्हांला जिणं

लई न्हाई, लई न्हाई मागणं !

[ शेवंतीच्या गाण्याला सारेजण साथ देतात.

संग्रह
अनुक्रम
नों. दि.
लय शाखा

★



# शुक्ल–साहित्य

## नाटकें

१ सौभाग्य-लक्ष्मी
२ सिंहाचा छावा
३ साध्वी मीराबाई
४ स्वर्गावर स्वारी
५ साक्षात्कार
६ सत्याग्रही
७ लोक-सिंहासन
८ मायेची शाल

## काव्य

१ कुमुद बान्धव
२ सुनीतिका
३ संगीतिका
४ रुपेरी रसधारा
५ कृष्णाचीं गाणीं
६ राधेचीं गाणीं
७ मिठे अंगूर
८ आवडतीं भावगीतें
९ शुक्लांचीं गाणीं

## नाटिका

१ चार चांदण्या
२ नवलनगरची राजकन्या
३ जंगल्या भिल्ल
४ वीर अभिमन्यु
५ जयद्रथ-वध
६ नाटक-नाटक
[भाग १ ते ३]
७ झुणका-भाकर

## कथासंग्रह

१ भरारी
२ कागदी बदाम
३ आठवा सर्ग
४ पारू

## विविध

१ प्रेमाच्या कानगोष्टी [प्रबंध]
२ कमलेची कहाणी [कादंबरी]
३ नवी राजवट [कादंबरी]

## चित्रपट

१ ध्रुव
२ राजा श्रियाळ
३ देवयानी
४ अकरावा अवतार
५ नारद-नारदी
६ गोरा कुंभार
७ भक्तीचा मळा [मालो]
८ गजाभाऊ
९ नृसिंहावतार [हिंदी]
१० महानंदा
११ सती चांगुणा
१२ चक्रव्यूह
१३ पंढरीचा पाटील
१५ जग हें असंच!
१५ नंदकिशोर
१६ गंगावतरण [हिंदी
१७ जय पांडुरंग!
१८ भारत-कन्या

वरील सर्व पुस्तकें 'जय हिन्द प्रकाशन' कडे मिळतात.

देवबा : सावकार–सावकार ! म्हाराच्या घरची झुणका–भाकर खाणार तुम्ही ?

सावकार : काय हरकत आहे ?

अनंतराव : एकनाथमहाराजसुद्धां महाराच्या घरीं जेवले होते !

सावकार : आम्ही फक्त साधुसंतांचे गुण गातो. त्यांचीं भजनं गातो. पण त्यांनीं उपदेशिलेलीं माणुसकीचीं, समतेचीं तत्त्वं मात्र आचरणांत आणीत नाहीं.

अनंतराव : प्रत्यक्ष पंढरीनाथ पांडुरंग आपल्या भक्तासाठीं महार बनला होता !

सावकार : मग आम्हां पामरांची काय कथा ! हऱ्या, आण तुझी झुणका–भाकर !

जंबूआण्णा : छान–छान ! म्हणजे दोन दिवसांच्या उपोषणाचं पारणं आमचे मालक आतां महाराघरच्या झुणका–भाकरीवर सोडणार !

अनंतराव : जंबूआण्णा ! आतां तुम्हीही खा हा झुणका–भाकरीचा प्रसाद ! तुमच्या पंगतीला बसून सहभोजन करायला आम्ही तयार आहोंत ! मुलांनों ! आपली ट्रीप आतां इथंच ! सोडा आपापल्या शिदोऱ्या !

देवबा : धर्मा, शिदनाक ! आपणबी आपल्या शिदोऱ्या सोडूंया हतंच !

जंबूआण्णा : मालक ! आज तुमचा पुनर्जन्म झाला ! घरीं गेल्यावर एक फक्कडसा सत्यनारायण केला पाहिजे.

[redacted]ार : सत्यनारायण करायचाच ! अन् साऱ्या गांवाला झुणका–भाकरीचा प्रसाद वांटायचा ! शिदनाक, देवबा, धर्मा ! तुमच्या हातूनच प्रसाद वांटायचा बरं का !

धर्मा : अवो, झुणका–भाकर तरी समद्यास्नी पोटभर खायला मिळावी...

शेवंती : हेंच आमचं देवाजवळ मागणं आहे.

लई न्हाई, लई न्हाई मागणं
देवा, लई न्हाई, लई न्हाई मागणं !

समद्यांना खायास पोटभर
दे कष्टाची झुणका-भाकर
मानाचं अन् माणुसकीचं
जगुंद आम्हांला जिणं

लई न्हाई, लई न्हाई मागणं !

[ शेवंतीच्या गाण्याला सारेजण साथ देतात.

अनुक्रम ७०४५८
नों. दिं. २५/३/७५
...लय शाखा

★

